सरस्वती शिक्षण प्रसारक समाज संचलित डॉ. एन वाय.तासगांवकर इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, डिकसळ,ता.कर्जत,जि.रायगड

---

नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०२५/प्र.क्र.११४/२५/शिक्षण-२**
**गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,**
**नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१**
**दिनांक:- ०५/१२/२०२५**

**संदर्भ-:** १. शासनाचे समक्रमांकाचे "आवश्यकता प्रमाणपत्रे" दि .२६.०३.२०२५.
२. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.M-१९०११/१३/२०२५-NMC/ /PGMARB, दि. २७.११.२०२५

**प्रस्तावना -:**सरस्वती शिक्षण प्रसारक समाज संचलित डॉ.एन.तासगांवकर इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड या संस्थेत MD/MS या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील शासन पत्रान्वये "आवश्यकता प्रमाणपत्र" देण्यात आले होते. सदर प्रकरणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. २ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संस्थेने प्रस्तावित केलेल्या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-:** राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी संदर्भाधीन क्र. २ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, शासन याद्वारे सरस्वती शिक्षण प्रसारक समाज संचलित डॉ.एन.तासगांवकर इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून खाली नमूद वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | MS (General Surgery) | ४ |
| २ | MD (General Medicine) | ४ |
| ३ | MS (Orthopedics) | ३ |
| ४ | MD (Paediatrics) | ३ |
| ५ | MS (Obstetrics & Gynecology) | ३ |
| ६ | MD (Anesthesiology) | ४ |
| ७ | MD (Radio Diagnosis) | ४ |
| ८ | MD (Dermatology, venereology & Leprosy) | ३ |
| ९ | MS (Otorhinolaryngology)(ENT) | ४ |
| १० | MS (Ophthalmology) | ४ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास उक्त प्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार राहिल.

२. राज्य शासन/केंद्रशासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी आयुष अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८ चा (६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६. सदरहू संस्थेस आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करता येणार नाही.
७. शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.
८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.
९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.
१०. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहीत मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.
११. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याकरीता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.
१२. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भ क्र.२ येथे नमूद पत्रातील अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३. सदर आदेश हे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन दि.२७.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP
GORAKHNATH
DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=418588839686584ca25060bf57af23a4473234ebcc421d084d8890fc37c8f673, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7B44D71EACB46FA051532FB66A73DA715F678033161C1162FA83F6713D03552, cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2025.12.05 11:38:04 +05'30'

**(संदीप ढाकणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली-११००११
११. सचिव, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, पॉकेट-१४, सेक्टर-८, द्वारका फेस-१, नवी दिल्ली- ११००७७
१२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१५. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
१७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१९. सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
२०. अध्यक्ष, सरस्वती शिक्षण प्रसारक समाज संचलित डॉ.एन.तासगांवकर इन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड
२१. निवडनस्ती (शिक्षण-२)